# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी – २२६१७९६१ , फॅक्स – २२६९०००७

E-mail : desk18@dtemaharashtra.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


रजिस्टर्ड एडी

जा.क्र.१८/तशिसं/डीबीटी -ईबीसी/२०१७/१६०
दिनांक : २६/०९/२०१७

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

विषय : राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता निश्चित करण्यात आलेली किमान गुणवत्तेची अट शिथिल करण्याबाबत...

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तशिसं/ईबीसी-बॅनर्स,पाम्पलेट/२०१७/११०, दि. २६/०७/२०१७.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. टीईएम २०१६/प्र.क्र.५५९/तांशि-४, दिनांक, ११ ऑगस्ट, २०१७.
३) या कार्यालयाचे पत्र क्र. १८/तशिसं/डीबीटी-ईबीसी/२०१७/१३६, दि. २२/०८/२०१७.

उपरोक्त संदर्भ क्र.१ च्या या कार्यालयाच्या पत्रासोबत राज्यातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरिता राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना या दोन योजनांच्या माहितीबाबतची वॉटरप्रुफ बॅनर्स आपल्या विभागाअंतर्गत येणा-या संस्थांनी वितरित करण्याकरिता आपल्या कार्यालयास पाठविण्यात आली होती.

सदर संदर्भ क्र.१ च्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, सदर बॅनर्समध्ये पालकांचे वार्षिक उत्पन्न मर्यादेबाबत मुद्दा क्र. ब) मध्ये ज्यांचे रुपये २.५० लाखापेक्षा अधिक ते रुपये ६.०० लाखापर्यंत वार्षिक उत्पन्न अशा विद्यार्थ्यांसाठी पात्रता परीक्षेतील (दहावी/बारावी) गुण ६० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असणेबाबतची किमान अट निश्चित करण्यात आलेली असल्याचे नमूद केले आहे. परंतु, शासनाने वरील संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये सदर किमान गुणवत्तेची (६० टक्क्यांची) अट शिथिल केलेली असून सदर शासन निर्णयाची प्रत आपणांस या कार्यालयाच्या वरील संदर्भ क्र. ३ अन्वये पाठविण्यात आलेली आहे. तरी याबाबत कळविण्यात येत आहे की, आपण आपल्या विभागातील ज्या संस्थांना सदर बॅनर्स पाठविलेली आहेत त्या संस्थांना उपरोक्त किमान गुणवत्तेची (६० टक्क्यांची) अट शिथिल करण्यात आल्याबाबत आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे.

( डॉ. सुभाष महाजन )

पृष्ठांकन क्र.:-विकाअ/शिक्षण/२०१७/ 2308
सहसंचालक, तंत्रशिक्षण वि.का.अमरावती.
दिनांक 07 OCT 2017

प्र. सहसंचालक तंत्रशिक्षण
अमरावती.

प्रत :-
१) प्राचार्य, सर्व संस्था अमरावती विभाग अमरावती , यांना कळविण्यात येते की, सोबतच्या पत्रान्वये आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.
२) प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.